# भारतीय स्त्री

## आव्हाने व उपाय

: संपादक :
प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे
प्रा. डॉ. विश्वनाथ सूर्यवंशी



Scanned with OKEN Scanner

# भारतीय स्त्री

## आव्हाने व उपाय

:: संपादक ::

डॉ. तुकाराम फिसफिसे
डॉ. विश्वनाथ सुर्यवंशी

NEW MAN
PUBLICATION
www.newmanpublication.com

Scanned with OKEN Scanner

**ISBN: 978-93-91621-53-7**

**Title:** Bhartiya Stree: Avhane Wa Upay (भारतीय स्त्री : आव्हाने व उपाय)
**Editors:** Dr Tukaram R. Fisfise and Dr Vishwanath M. Suryawanshi

© Editors

**First Edition :** March 2022

**Published by**
Dr Kalyan Gangarde
*for* New Man Publication,
104-A, Shivram Nagar, Parbhani - 431401.
Mob. + 91 8329000732
Email: nmpublication@gmail.com
www.newmanpublication.com

**Printed at**
Snehal Printers and Book Binders,
104-A, Shivram Nagar, Parbhani – 431401
Mob. + 91 9730721393

**Price: Rs 395/-**

All rights reserved. No material may otherwise be copied, modified, published, or distributed without the copyright owner's prior written permission.

Academic facts, views, and opinions published in the book express the author's views solely. The author is responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The publisher cannot be held accountable for any lacks or possible violations of third parties rights.

१६. स्त्री-भ्रूणहत्या एक सामाजिक समस्या
प्रा. उगीले माधव उत्तमराव ११२
१७. राजा राममोहन रॉय यांचे स्त्री विषयक विचार
प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार, श्री. गोविंदराव मुनघाटे ११७
१८. भारतीय खेळात पी.टी. उषाचे योगदान : एक अध्ययन
प्रा. डॉ. येरावार किरण किशनराव १२२
१९. ग्रामगीतेतील महिलोन्नती
प्रा. डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे १२५
२०. स्त्री उद्धारकर्त्या : सावित्रीबाई फुले एक समाजशास्त्रीय अध्ययन
दलित सुभाषराव कांबळे, दीपक धारवाडकर १३१
२१. उदारमतवादी स्त्रीवाद
डॉ. श्रीनिवास पिलगुलवार १३७
२२. स्त्रीवाद आणि कुटुंबसंस्थेमध्ये झालेली स्त्रियांची अवहेलना
डॉ. जयशीला बसवंत मनोहर १४५
२३. स्त्रीवादी विविध दृष्टीकोण
प्रा. संदीपकुमार भिमराव लोखंडे १४९
२४. जागतिकीकरण आणि भारतीय महिला
प्रा डॉ सचिदानंद फुलचंद खडके १५६
२५. मैत्रेयी आणि गार्गी : प्राचीन काळातील तत्त्वज्ञ स्त्रिया
डॉ. सचिन बाबुराव खोकले १५९
२६. भारतीय राजकारणात महिला सहभागाची समस्या आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण
डॉ. प्रविण दि.मुधोळकर १६३
२७. समाजसुधारकांचे स्त्रियांच्या उध्दारातील योगदान
रागिनी लक्ष्मण पाचांगे १७१
२८. भारतीय क्रीडा क्षेत्रात महिला खेळाडूंचा प्रेरणादायी प्रवास
प्रा. कल्याण पोल, प्रा. अब्दुल अन्सार १७६
२९. भारतीय स्त्री जीवनाचा ऐतिहासिक आढावा
संगीता पंडित राजापूरकर १८१
३०. स्त्रियांच्या उद्धारातील संत साहित्याचे योगदान
डॉ.सारिका अशोकराव बुरगे १८७
३१. क्रीडा क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान
प्रा. तत्तापुरे जे.जी. १९२



Scanned with OKEN Scanner

३१.

# क्रीडा क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान

प्रा. तत्तापुरे जे.जी.
क्रीडा विभाग प्रमुख
बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

पूर्वीच्या काळात खेळाकडे मनोरंजनाची किंवा मोकळ्या वेळेत करण्याची एक कृती म्हणून पाहिले जायचे त्यामुळे खेळाचा प्रसार व प्रचार म्हणावा तसा झाला नाही. परंतु मागील काही वर्षात जगभर खेळाच्या लोकप्रियतेत वाढ होत गेली आहे. आजही तीच परिस्थिती आहे. पुढील काळात ही त्यासाठी पोषकच काळ असेल अशी चिन्हे दिसत आहेत.

आधुनिक ऑलिंपिक खेळाचा इतिहास पहिल्यास हे चित्र अधिक स्पष्ट होते. १९१६ साली ऑलिंपिक स्पर्धेत १३ देशामधील एकूण ३९७ खेळाडूंनी भाग घेतला होता या मध्ये एकही महिला खेळाडू नव्हती व केवळ ९ क्रीडा प्रकाराचा समावेश होता. १०० वर्षानंतर १९९६ साली झालेल्या ऑलिंम्पिक स्पर्धेत १९६ देशातील १०,००० पेक्षा जास्त खेळाडूंनी भाग घेतला होता ज्यात महिलांचे प्रमाण जवळ जवळ ४०% होते व एकुण २५ क्रीडा प्रकारांचा समावेश त्या स्पर्धेत करण्यात आला होता.

वरील उदाहरणावरून हे सिद्ध होते महिलांचे प्रमाण व त्याचा खेळातील नैपुण्य वाढत गेले हे आपणास दिसून येते.

**स्त्रिया व त्यांची क्रीडाप्रकाराची आवड व निवड :** शारीरिक मानसिक व भावनात्मक घडणीनुसार स्त्रीया खेळाची निवड करतात. घरातील व समाजातील वातावरणाचा, नियमाचा, रूढी, धर्म यांचा परिणाम त्यांच्या खेळाच्या निवडीवर झालला दिसतो. या बंधनामुळे त्यांना खेळाच्या निवडीचे स्वातंत्र मिळत नाही. सुरक्षा स्त्रीला महत्त्वाची वाटते म्हणून ती बंधने स्विकारते हे चित्र पुरातन काळात होते पण या आधुनिक काळात स्त्रीयाही वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात सहभाग घेऊन राज्यस्तर, राष्ट्रीय स्तरावर, अंतरराष्ट्रीय स्तरावर खेळात सहभाग होत आहेत. तसेच ते आपल व देशाचे नाव लौकिक करत आहेत.



Scanned with OKEN Scanner

**देशातील स्त्रीयांचे कामगिरी :** आपल्या देशातील विविध क्रीडा केंद्रावर परिश्रम करून आपआपल्या क्रीडा क्षेत्रात भारताचे नाव लौकिक करत आहे.

ऑलिंपिक सारख्या क्रीडा स्पर्धेत ही नेत्रदिपक कामगिरी करून विविध पदके प्राप्त करत आहेत. त्यामुळे या क्रीडा क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाडत आहे. पी.टी. उषा पासून ते सायनानेहवाल, पी.व्ही. सिंधू, मेरी कॉम, सानिया मिर्झा, साक्षी मलिक अशा विविध महिला खेळाडू आपआपल्या क्रीडा क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी करत आहेत उच्च स्तरावरील स्पर्धेत उत्तम कामगिरी करून क्रमांक मिळवीत आहेत. अनेक स्त्रिया खेळाडू देशाने नाव लौकिक करत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली नविन खेळाडूही निर्माण होत आहेत. नविन खेळाडूंना प्रशिक्षण देऊन त्यांची गुणवत्ता वाढवत आहेत.

**राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत स्त्रियांची कामगिरी :** अनेक क्रीडा स्पर्धेत महिला खेळाडूंचे कार्य उल्लेखनिय आहे. सध्याच्या या राष्ट्रकुल स्पर्धेत ही भारतातील महिला खेळाडूंचे योगदान उल्लेखनिय आहे महिलांनी वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात कार्य करू क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, कांस्य व रजत पदक मिळविले असून त्यांचा भारत सरकारनेही गुणगौरव केला आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांना नौकऱ्या दिल्या गेल्या आहेत. विविध पुरस्कारही प्रदान केले आहेत. त्यामुळे आनखिन महिला खेळाडूंना प्रेरणा मिळत आहे व महिलांचे प्रमाण वाढत आहे.

उदयन्मुख खेळाडूंना त्याचा फायदा होत आहे त्या आपल्या क्रीडा प्रशिक्षण काळात मनलाऊन परिश्रम अधिकचे घेत आहेत. त्यामुळे देशात क्रीडा वातावरण निर्मिती होत आहे. त्यामुळे शाळा महाविद्यालय अशा शैक्षणिक ठिकाणीही महिला खेळाडू खेळातील होणाऱ्या विविध स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**ऑलिंपिक स्पर्धेतील कामगिरी :** स्त्रीच्या अवनतीचा हा काळ फार दुरचा नव्हे प्राचिन ऑलिम्पिक स्पर्धेत महिलांचा समावेश प्रथम नव्हता त्यामुळे त्यांना क्रीडा स्पर्धेत त्या कोणत्याही असो त्यात त्यांचा समावेश नसत नंतर काळ बदलत गेला व आधुनिक ऑलिंपिकच्या काळाला सुरूवात झाली याकाळात स्त्रीयांचा समावेश करण्यात आला. प्रथमच्या काळातही स्त्रीयांचा सहभाग कमीच होता जसे जसे इतर देशांचे प्रमाण वाढत गेले त्याचप्रमाणे काही देशातील स्त्रीयाही मोठ्या संख्येने सहभागी होऊ लागल्या केवळ सहभाग न घेता आपआपल्या क्रीडा कौशल्यात नेत्रदिपक कामगिरी करण्यासाठी शारीरिक, मानसिक असे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन अशा स्पर्धेत



Scanned with OKEN Scanner

उतरू लागल्या त्यामुळे नवनविन जागतिक रेकॉर्ड होऊ लागले अशा परिस्थितही भारतीय महिलाही मागे राहिल्या नाहीत त्यांनीही तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन देशाचे व आपले नाव लौकीक करू लागल्या आहेत.

**महाराष्ट्रातील महिलांचे क्रीडा स्पर्धेतील कामगिरी :** गेली काही वर्ष सातत्याने विविध खेळात महाराष्ट्रातल्या महिलांची कामगिरी दखल घेण्याजोगी राहिलेली आहे. गेल्या राष्ट्रकुल स्पर्धेतही महाराष्ट्रातल्या अनेक महिलांचा पदकविजेत्यामध्ये सहभाग होता. महाराष्ट्रातल्या महिलांचे योगदान पाहता त्यातून भविष्यासाठी काही याजना आखण्याचा विचार करण्याची गरज आहे. नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ३० सुवर्णपदकांसह एकुण देशभरात चौथे स्थान प्राप्त केले पण त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राला अनेक पदके मिळवून देण्यात महाराष्ट्रातील महिला खेळाडूंचा मोठा वाटा होता. विविध खेळात महाराष्ट्रातल्या मुलींनी पदकविजेती कामगिरी करत या पदकांमध्ये भर घातली. नेमबाजी, जलतरण, जिम्नॅस्टिक्स, कबड्डी, खो-खो, बॅटमिंटन, टेबलटेनिस, अथलेटिक्स, वेटलिफ्टींग अशा विविध क्रीडा प्रकारात महाराष्ट्राला जी पदके मिळाली त्याच श्रेय महिला खेळाडूंना दयावे लागेल आकांक्षा व्होरा ही जलतरणपटू स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. महिला नेमबाजांनी सांघिक सुवर्ण पदकाचा धडाका लावला. अथलेटिक्समध्ये ललिता बाबरने महाराष्ट्राचे नाव उंचावले एक प्रकारे क्रीडाक्षत्रात महिला किती सक्षम आहेत. याचं हे उदाहरण म्हणता येईल.

**खेळाडू महिलांची मेहनत :** मुली या जात्याच मेहनती आणि जिद्दी असल्याचे दिसते मुलं तशी नसतात असे नव्हे पण कदाचित जन्मजात आणि संस्कारातून हे गुण त्यांच्यात आलेले असावेत. त्यांचा कुठेतरी कसा क्रीडाक्षेत्रातील या यशात दिसून येतो. घरातल्या विविध जबाबदाऱ्या पार पाडतांनाच खेळाकडेही लक्ष देण्याची तारेवरची कसरत मुली खेळाडूंना करावी लागते. अर्थात, हे योग्य आहे असे नव्हे, पण त्यातूनच त्या तावून सुलाखून निघतात आणि त्याचे प्रत्यंतर नंतर त्यांच्या कारकीर्दीत दिसुन येते. गेल्याकाही वर्षात मुलींनी खेळाकडे वळावे यासाठी पालकही अनुकूल असल्याचे दिसू लागले आहे. सायना नेहवाल, मेरी कोम, सानिया मिर्झा, दिपिका पल्लीकल दिपीकाकुमारी अशा मुली आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजू लागल्यानंतर त्यांचा आदर्श समोर ठेवत असल्यामुळे मुलींच्या संख्येत नव्याने भर पडते आहे. मैदानी खेळाडू पासुन ते अगदी कॅरम, बुद्धिबळ

अशा बैठ्या खेळापर्यंत सगळ्या खेळांत मुलींची संख्या वाढलेली आहे. किंबहुना, दखल घेण्याजोगी कामगिरी मुली या खेळात करीत आहेत. कदाचित, मुली या निश्चित करून दिलेले ध्येय वाढण्यासाठी १०० टक्के प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय नेमबाज दीपाली देशपांडे यांच्या मते मुली खेळातील कारकीर्दीशी खुप भावनिकदृष्ट्या जोडल्या गेलेल्या नसतात. तर आपल्याला योग्य मार्गाने चालत राहायचं आहे. एक दिवस यश आपल्याला मिळेल असा त्यांचा दृष्टीकोन असतो त्यामुळे त्या खेळात टेकून राहतात व आपले ध्येय संपादन करून आपले व देशाचे नाव उज्वल करतात.

**महिला खेळाडूंच्या समस्या :** महिला खेळाडूंना सामाजीक आर्थिक समस्या सोबतच शारीरिक समस्यांचाही सामना करावा लागतो अशा समस्यांवर मात करून जिद्दीने आपले लक्षं गाठण्यासाठी प्रयत्न करत असतात असून असे आपणास दिसून येते. त्याच सोबत शिक्षण ही घेतात खेळाला शिक्षणाची सांगड घालून खेळाडू नंतरच्या भूमिकाही त्या बजावतात क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक प्रशासकिय अधिकारी होवून ही त्या आपली कर्तव्य पार पाडत असतात. केवळ समस्या निर्माण झाल्यामुळे त्या थांबत नाहीत. त्यावर योग्य मार्ग काढून आली मेहनत सतत ठेवतात त्यामुळे आजच्या या युगात आधुनिकतेच्या ज्ञानाचा वापर करून क्रीडा कौशल्यांचा विकास करून आपली क्रीडा कामगिरी नेत्रदिपक करत आहेत.

**सारांश :** क्रीडा क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान खुप महत्त्वाचे आहे. इतिहासावर एकनजर टाकली असता त्यात महिला खेळाडूंचा तित्कासा सहभाग नव्हता पण सध्याच्या काळात केवळ सहभाग नसुन नवनविन जागतिक रेकॉर्ड बनवत आहेत. तसेच सन २०२१ मध्ये झालेले ऑलिम्पीक स्पर्धेत मैदानी स्पर्धेत महिला व पुरूषांच्या रिले स्पर्धेत घेण्यात आल्या यातून आपणास असे दिसून येते की, महिलांनाही खुप महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे.

**संदर्भ :**

१) गौर आपर्णा भावे (२०२०) बॉक्सिंगची राणी मेरी कॉम - वरदा प्रकाशन.
२) तारे विजय (२०२०) पी.व्ही. सिंधू - वरदा प्रकाशन.
३) गायकवाड नेताजी (२०२०) नारीशक्ती कुस्तीगीर भोगट भगीनींची यशोगाथा - वरदा प्रकाशन.

❑❑❑